आर.सी.सी.नं. ४६२/२०२१
शासन वि. सोमनाथ
**निशाणी क्र. २८**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ०१**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नावः– सचिन तुकाराम कदम,

वयः– ३८ वर्षे धंदाः– शेती.

राहणारः– सांगवी, ता. कोरेगांव जि. सातारा.

सत्य प्रतिज्ञेवर साक्ष देतो की,

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता एन.डी.बाबर यांचे कडूनः–**

माझ्या घरी माझी आई, बायको व दोन मुली व मी राहतो. माझ्या घराशेजारी सावत्र भाउ व सावत्र आई राहते. आरोपी सोमनाथची आई व बहिण आमच्या घराशेजारी राहत असल्यामुळे मी त्याला ओळखतो. सोमनाथ चव्हाण गावात राहतो. आरोपी व आमच्यात वाटेवरुन वाद आहेत. दि. १५.०८.२०२१ रोजी आम्ही आमचे घरी झोपलो असताना रात्री १०.३० वाजता सोमनाथ चव्हाण, पप्पु उर्फ पोपट जगदाळे, अमर जगदाळे यांनी हाक मारुन मला बाहेर बोलावून घेतले. मी बाहेर आलो. तेंव्हा पप्पु जगदाळे मला वाटेचा दस्त दाखव असे म्हणाला तेंव्हा सोमनाथ चव्हाणने शिवीगाळ केली. मी दस्त दाखवत असताना सोमनाथ चव्हाण यांने कु–हाड फेकुन माझ्या डाव्या हातावर मारली. तेंव्हा बाकीचे दोघे पप्पु व अमर माझ्या अंगावर आले. पप्पु जगदाळे सोमनाथच्या हातातील कु–हाड घेतली माझ्या डाव्या हातावर वार करीत असताना, माझ्या आईने तो वार डाव्या हातावर झेलला. आईच्या तळहातावरुन रक्त आले. सोमनाथने माझ्या दंडावर कोयत्याने वार केला त्या जखमेतुन रक्त निघाले. माझा आवाज ऐकुन माझा सावत्र भाउ संदीप व सावत्र आई सावीत्रा बाहेर आली. ते भांडणात पडले तेंव्हा सोमनाथ चव्हाणने सावत्र आईच्या दंडावर कोयत्याने वार केला. संदीपच्या खांदयावर व बोटावर सोमनाथ चव्हाणने कोयत्याने वार केला. माझ्या पत्नीने पोलीस स्टेशनला फोन केला. पोलीस गाडी घटनास्थळी आली. तेंव्हा आरोपी १ ते ३ हे पळून गेले.

मी कोरेगांव पोलीस स्टेशनला गेलो मला जास्त लागलेमुळे उपचाराकरीता कोरेगाव सरकारी दवाखान्यात पाठविले. दुसरे दिवशी सकाळी ७.३६ मिनीटांनी मी फिर्याद दाखल केली. आता मला मी दिलेली तक्रार दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तक्रारीस **निशाणी क्र. २९** देण्यात येत आहे. घटनास्थळ पंचनाम्यावेळी मी घटनास्थळ दाखविले. घटनास्थळावरुन कोयता,पिळयाचा लोखंडी गज,कु–हाड, दात्र्याचा विळा जप्त करुन पोलसांनी ताब्यात घेतले. आता मला लोखंडी गज, कोयता, कु–हाड, दात्र्याचा विळा दाखविण्यात आला याच हात्याराने आम्हाला मारहाण करण्यात आली. सदर हात्यारांना ओळखी करीता अनुक्रमे **आर्टीकल अ,ब,क,ड** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. आरोपी सोमनाथ व अमर हजर आहेत.

सरतपास पूर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. के.कदम यांचेमार्फत सुरु**

मी शेती करतो. घटनेच्यावेळी मी दुग्ध व्यवसाय करीत होतो. माझ्याकडे पीकअप गाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पिकअप भाडयाने बैल नेहणेकरीता व उसाचे वाडे विक्री करणे करीता देतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या राहत्या घराच्या शेजारच्या घरात मी माझी जनावरे बांधायचो तिथे वैरण रचायचो. हे म्हणणे खरे आहे की, संदीपचा वेगळा गोठा आहे तो गावात जाताना डांबरी रोडच्या कडेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, संदीपची आई व तो तिकडे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, वडील बरेच दिवसांपासून आजारी आहेत ते संदीपकडे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, संदीपची वैरणीची गंज दुस–याच्या शेतात आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरापासून चार घरे व दोन शेतीचे तुकडे सोडून संदीपचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जागेचया शेजारी सोमनाथची बहिण व आई राहते. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथ व त्याची पत्नी गावात राहतात. सोमनाथचे घर माझ्या घरापासून अर्धा कि.मी पेक्षा कमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथची बहिण मजूरीचे काम करते. हे मला माहित नाही की, सोमनाथची आई ७०. ७५ वर्षाची आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, ती वयस्कर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथच्या बहिणीचे व माझे घर एकाच ४५८/९ या गटात आहे. सोमनथच्या बहिणीच्या नावे पावणेदोन गुंठे क्षेत्र आहे. हे

म्हणणे खरे आहे की,  माझे वडिल, शंकर, रामचंद्र, बाळासो, नवनाथ या सर्वामध्ये मिळून ६ गुंठे क्षेत्र आहे. त्या क्षेत्रात आमच्या सर्वाची, सहा जणांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या व सोमनाथच्या बहिणीच्या घरामध्ये दीड गुंठे मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेवरुन आमच्यात ब–याचदा वाद झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि १२/८/२०२१ रोजी सोमनाथच्या आईने माझ्या विरुध्द फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या बाबत मला पोलीस स्टेशनला बोलाविले होते. पोलीसांनी मागितल्यावर मी काठी नेहून दिली. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३०/५/२०२१ रोजी सुलोचना गोडसेनी माझ्या विरुध्द फिर्यादी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र, शंकर, बाळासो,नवनाथ यांची घरे माझ्या घराच्या उजव्या बाजूला आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या समोर अशोक साळुंख यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, अशोकच्या घरालगत डांबरी रोड सुरु होतो. हे म्हणणे खरे आहे की, अशोक सोबत माझे संबंध चांगले असल्यामुळे त्यांने मला जाणेसाठी रस्ता दिला आहे. हे म्हणणे खरे  आहे की, डांबरी रोड गावात जातो. हे म्हणणे खरे आहे की, त्या  डांबरी रस्तयाची एक बाजू गावात जाते व एक सातारा पंढरपूर रस्त्याला मिळते. हे म्हणणे खरे आहे की, हायवेला जोडणारा रस्ता अरुंद व कच्चा होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याला कॅनोल व ओढा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता चढ उताराचा, वळणावळणाचा, दोन्ही बाजूला झाडे असणारा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता अरुंद असल्याने मोठी वाहने आल्यास दुस–या वाहनाला रस्त्या खाली उतरावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, माझी पीकअप गाडी अशोक साळुंखे यांच्या घरासमोर लावलेली असते. त्या गाडीला लोखंडी पत्रा असून त्याचा दरवाजा लोखंडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पीकअप गाडी गरजेनुसार शेती करीता व घरातील लोकांना बाहेर नेहणेकरीता करतो. हे म्हणणे खरे आहे की बैल वाहतुक करताना पीकअप गाडीत मॅट टाकतो. पीकअप मध्ये बैल बांधणेसाठी ८,९ लोखंडी हुक केले आहेत त्यात लोखंडी अॅगल लावलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाहेर जाणेसाठी मी डांबरी रस्त्याचा वापरतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी सातारा पंढरपूर रोडचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर खडडे असल्यामुळे बरेच अपघात व्हायचे. हे म्हणणे खरे नाही की, पीकअप मधून मी, माझी आई, माझा सावत्र

भाउ,सावत्र आई जात असताना अपघात झाला त्यामुळे आम्हाला किरकोळ जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला झालेल्या जखमा पिकअप गाडीतील पत्रा व हुक लागुन झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, अपघात झाल्याचा गैर फायदा घेवून सोमनाथ चव्हाणच्या आईने केस केल्याचा राग मनात धरुन ही खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सोमनाथच्या बहिणीने माझ्यावर केस केली तेंव्हा पप्पु जगदाळे आला होता म्हणून आला होता म्हणून त्याचा राग धरुन त्याचे नाव केस मध्ये घातले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गणेश मानेला मी मारहाण केली म्हणून माझे विरुध्द केस होती. हे म्हणणे खरे आहे की, रोहित शिंदेला मारहाण केली म्हणून माझे विरुध्द केस दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या केस मध्ये मी जामीनावर बाहेर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पाठीमागच्या तारखेला मी, अशोक साळुंखे सह कोर्टात आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, कोटात आल्यावर मी माझा जबाब वाचून पाहिला आहे.

प्रश्न – जखमा झाल्यानंतर तुम्ही पोलीस स्टेशनला कसे आला.

उत्तर – पोलीस स्टेशनच्या गाडीतुन कोरेगावला आलो. तेथून पुढे चुलत भावाच्या गाडीतुन सरकारी दवाखान्यात गेलो.

प्रश्न – पोलीस गाडीमध्ये किती पोलीस होते.

उत्तर – दोन

रात्री साडे बारा वाजता मी दवाखान्यात पोहचलो. हे म्हणणे खरे आहे की, दवाखान्यात डॉक्टर नव्हते. माझ्या आईचे टाके घेणेसाठी तिला सातारा सरकारी दवाखान्यात पाठविले. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टर नसलेमुळे आम्ही सर्वजण सातारा सरकारी दवाखान्यात गेलो. सातारा येथे आम्हाला अॅडमीट करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सोबत माझी पत्नी नव्हती. सातारा येथून आम्ही पोलीस स्टेशनला आलो. तेथुन घरी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, पुन्हा आम्ही पोलीस स्टेशनला आलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, तक्रार देणे पुर्वी आम्ही आपसात चर्चा केली होती.

हे म्हणणे खरे आहे की, जनावरांची वैरण तोडण्यासाठी घरी कुऱ्हाड असते.

प्रश्न – तुमच्या घरीपण कुऱ्हाड होती का.

उत्तर – माझ्या घरी कु–हाड नव्हती, कुटटी मशीन होती.

हे म्हणणे खरे आहे की, मका तोडण्याकरीता, गहु कापण्याकरीता शेतकर–याकडे कोयता असतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी कोयता व विळा होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरी सुरेश, अजय, मयुरेश नावाच्या व्यकती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अ ार्टीकल अ,ब,क,ड वरील मी पोलीसांना माझ्या घरातील पोलीसांना आणून दिल्या व आरोपींना गुन्हयात अडकविले.

प्रश्न – जप्त हत्यारांना रक्त लागले होते का.

उत्तर– कु–हाडीला लागले होते.

प्रश्न – कपडयांना रक्त लागले होते का.

उत्तर– कपडयांना रक्त लागले नव्हते.

प्रश्न – कोयत्याची लांबी रुंदी सांगता येते का.

उत्तर – कोयता दोन फुट असतो.

हे म्हणणे खरे आहे की, कु–हाडीची लांबी रुंदी मला सांगता येणार नाही.हे म्हणणे खरे आहे की, कोयत्याच्या जखमा हया खोलवर, सहा इंचापेक्षा जास्त व एक फुटभर होवू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, कु–हाडीच्या जखमा गंभीर स्वरुपाच्या व सहा इंचापेक्षा होवू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, अर्टीकल अ,ब,कड मुळे साध्या किरकोळ जखमा होवू शकत नाहीत. मी पंचनाम्यावर सही केली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझी सही नाही. सदर घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी क्रमांक ३०** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर कोणताही पंचनामा झाला नाही, कोणतीही हत्यारे जप्त केली नाहीत.

आरोपी विधीज्ञाच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.

**( श्रीमती यु. ए. भोसले )**

दि– १९/०८/२०२३ **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोरेगांव**